अखंड गतीतून सार्थकता








# लोकमंगल फाउंडेशन

## एक सामाजिक चळवळ

अखंड गतीतून सार्थकता

# अन्नपूर्णा योजनेस मान्यवरांची भेट

लोकमंगल फाऊंडेशन एक सामाजिक चळवळ



अखंड गतीतून सार्थकता



# लोकमंगल फाऊंडेशन

## एक सामाजिक चळवळ

मा. सुभाष बापू देशमुख यांनी लोकसेवेसाठी सामाजिक उपक्रम राबवता यावेत यासाठी सुरू केलेली चळवळ म्हणजे लोकमंगल फाऊंडेशन सेवाकार्याच्या माध्यमातून लोकमंगल फाऊंडेशन समाजाच्या अनेक क्षेत्रात पोहोचले. अन्नपूर्णा योजना, सामुदायिक विवाह सोहळा, जलसंधारण, आरोग्य सेवा, शिक्षण, शेतकरी, वृद्ध सेवा अशा अनेक योजनांतून मदत करत हा वटवृक्ष गरजवंतांना सावली देत आहे. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत सेवा पोहोचवणे हे आपले आद्यकर्तव्य मानून फाऊंडेशन काम करीत आहे. मा. बापूसाहेबांनी सुरू केलेली ही चळवळ अनेकांच्या सहकार्याने आज समाजात सेवेचा आदर्श निर्माण करत आहे. आम्हाला अजूनही काम करायचे आहे याची जाणीव आम्हाला नक्कीच आहे. आजपर्यंत केलेल्या कार्याची ओंजळ आपणास समर्पित करत सेवेसाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

**रोहन देशमुख**
अध्यक्ष
लोकमंगल फाऊंडेशन, सोलापूर



लोकमंगल फाउंडेशन एक सामाजिक चळवळ

# अन्नपूर्णा




अन्नपूर्णा योजना- ज्येष्ठ निराधार नागरिक हे समाजाचे घटक आहेत, ते उपाशी राहू नयेत या काळजीपोटी मा. सुभाषबापूंनी लोकमंगल अन्नपूर्णा योजना सन २०१३ मध्ये सुरू केली. ६० वर्षांवरील निराधार वृध्दांना दोनवेळ पुरेल एवढे विनामूल्य भोजन घरपोच दिले जाते हे या योजनेचे वैशिष्ट्य. लाभार्थ्यांच्या वयोमानाचा विचार करून सकस व सात्विक आहाराबरोबरच वेळेवर डबे पोहोचले जातील याचीही काळजी घेतली जाते. आजपर्यंत १४ लाखांपेक्षा अधिक डबे घरपोहोच दिले आहेत. दररोज किमान ५०० गरजूंना डबे पोहोचवले जातात. एका डब्याचा एक वर्षाचा सरासरी खर्च १८२५० रुपये इतका येतो. आपल्या वाढदिवसानिमित्त सत्कार, भेटवस्तू न स्वीकारता, जाहिरातबाजी न करता अन्नपूर्णा योजनेस मदत करावी असे आवाहन बापूसाहेबांनी केले आहे. अनेकजण धान्य देवून चांगला प्रतिसाद देत आहेत. सोलापुरातील शाळांतून 'एक मुठ्ठी अनाज' ला मोठा प्रतिसाद मिळत आहे. सध्या अन्नपूर्णा योजनेची व्याप्ती वाढली असून शहरातील अनेक रुग्णालयात जे रुग्ण परगावहून येवून दाखल होतात, त्यांच्या नातेवाईकांनाही जेवणाचे डबे पोहोचविले जातात.



लोकमंगल फाऊंडेशन एक सामाजिक चळवळ

# सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळा







विवाह प्रत्येकाच्या आयुष्यातला पवित्र सोहळा. गोरगरिब वधूवराचे संसाराचे स्वप्न साकार व्हावे, यासाठी लोकमंगल फाऊंडेशनतर्फे २००६ पासून सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले जाते. अनेक दाम्पत्यांच्या रेशीमगाठी एकाच मांडवात बांधल्या जातात. लग्न समारंभात होणारा खर्च कमी होवून तो पैसा जीवनात उपयोगी पडावा, जातीधर्माची बंधने कमी व्हावीत म्हणून आम्ही जबाबदारी स्वीकारली. सोहळ्यात विवाह थाटामाटात लावले जातात. वधूवरांना हळदीचे, अक्षतेचे कपडे, रूखवत, मणीमंगळसूत्र, भांडी आदी संसारोपयोगी वस्तू दिल्या जातात. सोलापूर व धाराशिव जिल्ह्यात मागील १९ वर्षात ३०८९ इतके विवाह लावण्यात आले आहेत. यात हिंदू २३८२, बौध्द ६७६, मुस्लिम २०, खिस्ती ४, जैन ७ दाम्पत्यांचा समावेश आहे. वधू, वर अनुसूचित जातीतील असल्यास शासनाच्या समाजकल्याण खात्यामार्फत दिले जाणारे अनुदान मिळवून दिले जाते. आतापर्यंत २८० जावयांना रोजगार व व्यवसायासाठी कर्ज देवून आर्थिक मदत करण्यात आली आहे. २०१९ पूर्वी विवाह झालेल्या दाम्पत्याच्या पहिल्या मुलीच्या नावे २००० रूपयांच्या सुकन्या ठेव योजनेच्या माध्यमातून फाऊंडेशनने मुदत ठेवी केल्या. अठरा वर्षे पूर्ण झाल्यानंतर या मुलींना व्याजासह सुकन्या योजनेची परतफेड मिळते.


लोकमंगल फाऊंडेशन
स्वागत कक्ष


साहित्य वाटप


लोकमंगल फाऊंडेशन
धू- वर साहित्य वाटप


धन्यवाद





# लोटस



## LOTUS

| | |
|---|---|
| 2022-23 | Rs.3,64,550 |
| 2021-22 | Rs. 6,15,700 |
| 2020-21 | Rs. 11,72,090 |
| 2019-20 | Rs. 11,61,550 |
| 2018-19 | Rs. 20,62,031 |
| 2017-18 | Rs. 17,48,332 |
| 2016-17 | Rs. 6,65,199 |
| 2015-16 | Rs. 1,73,900 |



लोटस - लोकमंगल ऑर्गनायझेशन फॉर टिचिंग अंडरप्रिव्हिलेज्ड स्टुडंडस - उच्च शिक्षण घेवून मोठे व्हावे, चांगली नौकरी मिळवावी हे विद्यार्थ्यांचे स्वप्न असते. पण काहींना हे शक्य होत नाही अशा विद्यार्थ्यांचे उच्चशिक्षण कोणत्याही आर्थिक कारणासाठी थांबू नये, म्हणून २०१५ पासून लोकमंगल फाऊंडेशनच्यावतीने अशा विद्यार्थ्यांना लोटस योजनेतून आर्थिक मदत दिली जाते. अनेक गरिब होतकरू विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ झाला आहे. प्रति वर्षी विद्यार्थ्यांना सहा ते सात लाख रुपये स्कॉलरशिपच्या माध्यमातून आर्थिक साहाय्य केले जात असून आजपर्यंत १९४ विद्यार्थ्यांना मदत करण्यात आली आहे. योजनेचे हे नववे वर्ष असून विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्ट्या दत्तक घेऊन ७९,६३,३५२ रुपयांची आर्थिक मदत आजतागायत करण्यात आली आहे. लोटस योजनेतून मदत झालेले अनेक विद्यार्थी उच्चशिक्षण घेऊन मोठ्या पदावर नौकरी करत आहेत तर काहीजण परदेशातही आहेत. शालेय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना गणवेश, वही, स्कूलबॅग आदी शालेय साहित्याचे वाटप केले जाते. शिक्षण क्षेत्रातील नामवंतांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभावे यासाठी प्रतिवर्षी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. २००६ सालापासून निबंध स्पर्धा घेतली जाते. दहावी परिक्षेत उत्तम गुण मिळवून पास झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार फाऊंडेशनतर्फे करण्यात येतो.

# भरारी

लोकमंगल फाऊंडेशन एक सामाजिक चळवळ



लोकमंगल फाऊंडेशनच्या लोटसने मला उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत दिली. त्यामुळेच मी युपीएससी परिक्षा देवू शकलो, पहिल्याच प्रयत्नात यशस्वी झालो, असे सारोळे गावचे सुपूत्र अक्षय पोपट वाले यांनी कृतज्ञापूर्वक सांगितले. त्यांची भारतीय वन सेवेत क्लासवन अधिकारीपदी (इंडियन फॉरेस्ट सर्व्हीस) निवड झाल्याबद्दल आ. सूभाष बापू देशमुख यांचे हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी वाले यांनी सांगितले की, माझ्यासारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला लोटसच्या सहकार्या मुळेच हे यश मिळवता आले. समाजातील गरीब, गरजवंत विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण आर्थिक कारणामुळे थांबू नये यासाठी सूभाष बापू देशमुख यांनी लोटस योजना सुरू केली. या योजनतून गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत होत आहे. लोटसमुळे आज अनेक विद्यार्थी डॉक्टर, इंजिनियर, अधिकारी पदावर पोहोचले आहेत.

लोकमंगल फाऊंडेशनने लोटस योजनेतून शैक्षणिकदृष्ट्या दत्तक घेतलेला पहिला विद्यार्थी वडाळा ता. उत्तर सोलापूरचा मंगेश लहू नाईक. मंगेशचा लोकमंगलशी शालेय विद्यार्थी असल्या पासूनचा स्नेह. ४ थी स्कॉलरशिप परिक्षा पास झाला त्यावेळी मा. बापूसाहेबांनी त्याचा पहिला सत्कार केला होता. या सत्कारातून त्याला प्रेरणा मिळाली अन् परिस्थितीवर मात करत तो शिकत राहिला. पुढे त्याची नवोदय विद्यालय पोखरापूरसाठी निवड झाली. वडाळ्यातील अल्पभूधारक शेतकऱ्याचा मुलगा असलेल्या मंगेशने जिद्दीने शिकत चांगले मार्क मिळवून इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतले. या काळात लोटसने उच्च शिक्षणासाठी त्याला आर्थिक मदत केली. नुकतीच मंगशेची निवड भारतीय विमानतळ प्राधिकरणमध्ये एअर ट्राफिक कंट्रोलपदी झाली. लोटसमुळेच मला उच्चशिक्षण घेता आले असून मा. सुभाष बापू देशमुख यांचा आदर्श ठेवून मी मला जसे जमेल तशी विद्यार्थ्यांना मदत करेन, अशी कृतज्ञता त्यांनी व्यक्त केली.





विष्णू मालगत्ती व लता मालगत्ती हे वयस्कर जोडपे मागील २ वर्षापासून लोकमंगल फाऊंडेशनच्या अन्नपूर्णा योजनेचे लाभार्थी. त्यांना रोज दोनवेळच्या जेवणाचा डबा पोहोच केला जातो. लताताई या ब्लड कॅन्सरने आजारी, तर पती हॉटेल कामगार. पण वयोमानानुसार आता काम करून शकत नाहीत. मुलगा १२ वर्षापासून कुठे आहे याचा पत्ता नाही. अशा या निराधार जोडप्याला अन्नपूर्णा योजनेतून रोज डबे पोहोच होतात. बापूसाहेबांनी अन्नपूर्णा योजना सुरू केल्यामुळेच आमच्या सारख्या निराधारांना आधार मिळाला हे सांगतांना त्यांचा कंठ दाटून आला. अशाच चांगल्या योजना बापूंना सुचत राहोत. आमच्या सारख्या गोरगरिबांना त्यांची मदत मिळत राहो असे त्या म्हणाल्या. या माऊलीने आ. सूभाष बापू देशमुख यांच्या कार्याविषयी आपली कृतज्ञता व्यक्त केली.

टिकेकर वाडीचे ८१ वर्षीय रहिवासी बाबूसिंग देवसिंग राजपूत गवंडी काम करत होते. वयोमानानुसार आता काम होत नाही. १४ वर्षांपूर्वी पत्नीचे निधन झाले. २ मुलं जन्मजात अपंग आहेत, तर १ मुलगा बापापासून दूर आहे. मागील चार वर्षांपासून लोकमंगल फाऊंडेशनच्या अन्नपूर्णा योजनेतून दोन अपंग मुलांसह बाबूसिंग यांना डबे दिले जातात. रजपूत म्हणाले, पत्नी गेल्यापासून मला माझे कसे होईल, यापेक्षा माझ्या दोन अपंग मुलांची जास्त चिंता होती. सुभाषबापूंनी आमची अवस्था जाणली अन् आम्हाला जगण्याचा आधार मिळाला. माझ्यासारख्या अनेकांना या योजनेतून रोज अन्न मिळत असल्यामुळेच आम्ही आज जगत आहोत नाहीतर आमचे काय झाले असते यांची कल्पना करवत नाही.



# आरोग्य









दुर्धर आजारावर उपचारासाठी रुग्णालयात दाखल असलेल्या गरजवंताला मुख्यमंत्री सहायता निधीतून आर्थिक साहाय्य मिळावे यासाठी आ. सुभाष देशमुख यांनी आपल्या कार्यालयात विशेष व्यवस्था केली आहे. फॉर्म भरण्यापासून ते रुग्णाला लवकर मदत मिळावी यासाठी प्रयत्न केले जातात. २०२३ सालात ९४ रुग्णांना रु. ७१,८२,५०० तर २०२४ सालात मार्च अखेरपर्यंत २९ रुग्णांना रु. १६,१४,५०० इतकी आर्थिक मदत मिळवून दिली. तसेच महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून रुग्णास उपचार मिळावेत यासाठी सहकार्य. यासोबतच फाऊंडेशच्यावतीने आरोग्य शिबिर, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर भरविण्यात येत असते. दिव्यांगांना साहित्य, कुबड्या व कृत्रिम अवयव वाटप, प्रतिवर्षी फाऊंडेशनच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत असते. डॉक्टर्स डे- लोकमंगल फाऊंडेशनतर्फे १ जुलै हा दिवस डॉक्टर्स डे म्हणून साजरा करण्यात येतो. सामाजिक भावनेतून रुग्णसेवा करणाऱ्या डॉक्टरांचा यथोचित गौरव करून त्यांना सन्मानचिन्ह व शुभेच्छापत्र देवून सन्मानित करण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| मार्च २२ ते मार्च २३ | | रु.२६,८२,५०० |
| एप्रिल - २३ | रुग्ण - ०६ | रु.४,१०,००० |
| मे - २३ | रुग्ण - ०७ | रु.५,५०,००० |
| जून - २३ | रुग्ण - ०६ | रु.४,७५,००० |
| जुलै - २३ | रुग्ण - ०५ | रु.५,००,००० |
| ऑगस्ट - २३ | रुग्ण - ११ | रु.१०,५०,००० |
| सप्टेंबर - २३ | रुग्ण - ०२ | रु.२,००,००० |
| ऑक्टोबर - २३ | रुग्ण - ०३ | रु.२,५०,००० |
| नोव्हेंबर - २३ | रुग्ण - ०७ | रु.६,३०,००० |
| डिसेंबर - २३ | रुग्ण - ०५ | रु.४,३५,००० |
| जानेवारी - २४ | रुग्ण - ०६ | रु.५,००,००० |
| फेब्रुवारी - २४ | रुग्ण - १४ | रु.१०,५०,००० |
| मार्च - २४ | रुग्ण - ०९ | रु.६,४५,००० |

**मुख्यमंत्री सहायता निधी**

लोकमंगल फाऊंडेशन एक सामाजिक चळवळ

# जलसंधारण




महाराष्ट्र राज्य हे देशात सर्वात जास्त धरणे, जलसाठे असलेले राज्य असून या धरणांमध्ये दरवर्षी साठत चाललेल्या गाळामुळे धरणांच्या साठवण क्षमतेत मोठया प्रमाणात घट होत आहे. 'गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार' योजना शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे. पाण्याचा साठा असलेल्या अनेक तलावात मोठ्या प्रमाणात गाळ साठला आहे. लोकमंगल फाऊंडेशनतर्फे तलावातील हा गाळ काढून शेतकऱ्यांना विनामूल्य भरुन दिला जातो. हा गाळ खत म्हणून शेतीसाठी उपयुक्त असून त्यासाठी शासनाचे अनुदानही शेतकऱ्यांना मिळावे यासाठी साहाय्य केले जाते. आतापर्यंत सुमारे १०.०० लाख घनमीटर गाळ काढण्यात आला. यामुळे १०० कोटी लीटर पाण्याची साठवण क्षमता वाढली असून पन्नास हजार लोकसंख्येला ३६५ दिवस पुरेल इतका पाणीसाठा वाढत आहे. यामुळे ८०० एकर क्षेत्रास वाढीव पाण्याचा लाभ होऊ शकतो. आजतागायत ६५० शेतकऱ्यांनी याचा लाभ घेतला आहे. ❋ एकरुख मध्यम प्रकल्प, उळे ❋लघुपाटबंधारे तलाव, सोरेगांव ❋ बीबी दारफळ, हिप्परगा तलाव येथेही जलसंधारणाचे काम करून शेतकऱ्यांना गाळ वाटप करण्यात आले. याबरोबरच ग्रामीण भागात अनेक ठिकाणी ओढ्यांचे खोलीकरण, रूंदीकरण करण्यात आल्याने पाण्याचा स्त्रोत वाढण्यास मदत झाली आहे.



लोकमंगल फाउंडेशन एक सामाजिक चळवळ

# समृध्दी ग्राम अभियान








सोलापूर जिल्ह्यात ग्रामीण भागाच्या विकासाला गती मिळावी म्हणून मा. सुभाष बापू देशमुख यांनी लोकमंगल समृध्दी ग्राम अभियान सुरू केले. गाव हेच विकासाचे केंद्र मानून लोकसहभागातून विकास हे ध्येय निश्चित केले. ग्रामस्थांचे शहराकडे होणारे स्थलांतर थांबावे यासाठी गावातील लोकांना गावातच रोजगार कसा मिळेल याचे नियोजन करत गाव आनंदी व समृध्द करण्यावर लक्ष केंद्रीत केले १. सामूहिक उत्पादन २. स्वावलंबन ३. रोगमुक्ती ४. आनंदीजीवन ५. सहजीवन या पंचसुत्रीवर समृध्द गाव योजना आधारित आहे. पंढरपूर तालुक्यातील चिंचणी हे गाव लोकमंगल समृध्दी ग्राम अभियान विकासाचे रोल मॉडेल बनत आहे. हे अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी शिक्षक, महिला बचत गटाचे सदस्य, युवक, शेतकरी गट, सामाजिक कार्यकते, राजकीय नेतेमंडळी, आशासेविका यांचेसह अनेकांचा सहभाग मोलाचा ठरत आहे. कमी खर्चात रसायनमुक्त नैसर्गिक शेती, पीकांच्या स्थानिक जातींचे संवर्धन, नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन, पर्यावरण रक्षण, सांस्कृतिक चळवळ, शेतमालावर प्रक्रिया प्रशिक्षण, कृषिमाल व बचत गटांना बाजारपेठा, महिला सक्षमिकरण, स्वच्छता अभियान, कृषि पर्यटन यासारखे अनेक उपक्रम राबवत गावाला समृध्दीच्या मार्गावर नेण्याचे ध्येय साकारत आहोत.

लोकमंगल फाऊंडेशन एक सामाजिक चळवळ



दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



भजनी मंडळास फांऊडेशनतर्फे भेट




जागतिक महिला दिन




गरीब होतकरु विद्यार्थ्यांना वहीवाटप




आदर्श माता पुरस्कार




किल्ले बांधणी स्पर्धा

# रोजगार मेळावा






नोकरीच्या शोधात असलेल्या गुणवत्तापूर्ण उमदेवाराला संभाव्य कंपनीशी जोडण्यासाठी रोजगार मेळावे आयोजित केले जातात. अनेक प्रसिद्ध कंपन्या आणि नियोक्तो या मेळाव्यात भाग घेतात यामुळे उमेदवाराला एकाचवेळी अनेक ठिकाणीची माहिती मिळते. लोकमंगल फाऊंडेशन पं. दीनदयाल उपाध्याय रोजगार व स्वयं रोजगार मेळाव्याचे आयोजन करते. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य राजेगार उद्योजकता नाविन्यता विभाग आणि वर्क फोर्स सेंटर प्रा. लि. याचे सहकार्यातून हा मेळावा आयोजित केला जातो. आतापर्यंत ४०० पेक्षा अधिक तरुणांना नोकऱ्या मिळाल्या, तर अनेक तरुणांना नोकरी देण्याची प्रक्रिया सुरू आहे. स्वयंरोजगार मेळाव्यात मोठ्या प्रमाणात उत्सुक उद्योजकांनी सहभाग नोंदवला होता. शासनाच्या स्वयंरोजगारासाठी असलेल्या विविध योजनांना अर्थसहाय्य आणि मार्गदर्शन करणाऱ्या अनेक महामंडळांनीही सहभाग नोंदवला. लोकमंगल फाऊंडेशनच्यावतीने सोलापुरातील विविध कॉलेजेसच्या कॅम्पस निवडीमध्ये देशभरातील विविध कंपन्यांना आमंत्रित करण्यात येते. लोकमंगल फाऊंडेशनच्या याच उपक्रमांतर्गत सोलापूर मधील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

# वृक्षारोपण







वृक्षसंवर्धन ही काळाची गरज बनली आहे. बदलत्या निसर्गाने मानवावर विचार करण्याची वेळ आणलीय. ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न जगाला भेडसावत आहे. वातावरण बदलामुळे पावसाची अनिश्चितता वाढलीय. जागतिक तापमानातील वाढीमुळे सजीवांचं अस्तित्व धोक्यात आलं आहे. शुद्ध हवा, ऑक्सिजनसाठी झाडांशिवाय पर्याय नाही हे लक्षात घेवून लोकमंगल फाऊंडेशनने सोलापूर शहर व जिल्ह्यात वृक्षारोपणाची चळवळ सुरू केली. झाडं लावून ती जगवण्याची जबाबदारी व्यक्ती, संस्थांवर सोपवत वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाचे महत्व पटवून दिले. लोकमंगल समुहाशी संबंधीत संस्था, शाळांमधून सातत्याने वृक्षारोपणाची मोहिम सुरु असते. २०२२ मध्ये विशेष मोहिम राबवत २०४५, साखर कारखान्यावर १२५० इतके तर श्रीराम ग्रामीण संशोधन विकास प्रतिष्ठान परिसर वडाळा येथे १२८५ इतके वृक्षारोपण करण्यात आले. आ. सुभाष बापू देशमुख यांच्या प्रेरणेतून पंढरपूरपासून जवळच भंडीशेगाव येथे ४२ एकरांवर ड्रीम गार्डनची निर्मिती करण्यात आली असून या गार्डनमध्ये मोठ्या प्रमाणात फळझाडं लावण्यात आली. तर चिंचणी गावात ९ हजारांपेक्षा अघिक वृक्ष लागवड करून संगोपन करण्यात करण्यात येत आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील नांदणी येथे बापूंनी जिल्ह्यातील पहिले वन उद्यान साकारले असून या उद्यानात स्थानिक वृक्षप्रजातींची लागवड करण्यात आली.



## प्रसिध्दी

लोकमंगल फाउंडेशन एक सामाजिक चळवळ



लोकमंगल
फाऊंडेशन एक सामाजिक चळवळ

# लोकमंगल शिक्षकरत्न पुरस्कार






लोकमंगल फाऊंडेशनचा शिक्षकरत्न पुरस्कार प्रतिष्ठित व समाजमान्यता पावलेला आहे. गेल्या १४ वर्षांपासून हा उपक्रम चालू आहे. यामध्ये २ प्राथमिक शिक्षक, २ माध्यमिक शिक्षक, २ उच्चमाध्यमिक शिक्षक, १ महाविद्यालयीन शिक्षक, १ क्रीडा व कला, १ दिव्यांगासाठी काम करणारे शिक्षक, १ नवोपक्रम राबविणारे शिक्षक व एक असे शिक्षक की, ज्यांच्या विद्यार्थ्यांने सोलापूरचे नाव केवळ देशातच नव्हेतर विश्वस्तरावर नेले आहे, अशा शिक्षकाला मअब्दुल कलाम पुरस्कारानेफ सन्मानित केले जाते. या पुरस्काराचे स्वरूप मानपत्र, शाल व पुस्तकं असे आहे. तसेच सोलापूर जिल्हयातील दोन प्राथमिक शाळांना देखील आदर्श शाळा पुरस्कार देत आहोत. यासाठी, एक तज्ञ समिती अत्यंत काटेकोरपणे काम करीत आहे. या पुरस्काराला समाजात प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे. पुरस्कार वितरण समारंभासाठी महाराष्ट्रातील नामवंत शिक्षणतज्ञ, व्याख्याते, कवी यांना निमंत्रित करून त्यांच्या मार्गदर्शनाने या कार्यक्रमाची उंची वाढविली जाते. लोकमंगल फाऊंडेशन शिक्षकरत्न पुरस्कार विजेत्या शिक्षकांना पुढे जावून त्यांना विविध संस्था, महाराष्ट्र शासन व राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त होतात, हे अनेकवेळा अधोरेखीत झाले आहे, ही बाब फाऊंडेशनसाठी अभिमानास्पद आहे.

लोकमंगल फाऊंडेशन एक सामाजिक चळवळ




# लोकमंगल फाऊंडेशन

१३-अ, 'अन्नपूर्णा', सह्याद्री कॉलनी, विकास नगर, जुना होटगी नाका, सोलापूर - ४१३ ००३.

अखंड गतीतून सार्थकता

## साहित्य पुरस्कार










मराठी साहित्यात आपल्या दर्जेदार साहित्याने मूल्यात्मक भर घालणाऱ्या साहित्यिकांच्या साहित्यकृतींना योग्य दाद मिळावी या जाणिवेतून लोकमंगल फाऊंडेशनच्यावतीने लोकमंगल राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार २०१५ सालापासून सुरू करण्यात आला. रु. २५ हजाराचे तीन राज्यस्तरीय पुरस्कार व रु.११ हजाराचा एक पुरस्कार सोलापूरच्या साहित्याला देण्यात येतो. याशिवाय २५ हजाराचा एक पुरस्कार साहित्य क्षेत्रात लक्षणीय काम करणा-या संस्थेला वा व्यक्तीला देण्यात येतो. हा पुरस्कार सोहळा दरवर्षी डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात सोलापुरात संपन्न होतो.

लोकमंगल मैत्र दिवाळी अंकाने साहित्य क्षेत्रात मानाचे स्थान निर्माण केले आहे. दिवाळी अंकास राज्यस्तरीय अनेक पुरस्काराने गौरवलं आहे. २०२१ चा अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाचा उत्कृष्ट दिवाळी अंक निर्मिती पुरस्कार, छंदश्री अंतरराष्ट्रीय दिवाळी अंक स्पर्धेत उत्कृष्ट अनुवादाचा प्रथम पुरस्कार, अनुवादाचा द्वितीय पुरस्कार, उत्कृष्ट व्यंगचित्रकाराचा द्वितीय पुरस्कार, उत्कृष्ट निर्मितीचा तृतीय पुरस्कार, याचबरोबर पुण्यभूषण पुण्याचा उत्कृष्ट कवितेचा ११००० चा पुरस्कार तसेच छंदश्री चा उत्कृष्ट कथा अनुवादाचा पुरस्कार, त्याचबरोबर प्रकाशक संघाचा दोन वेळा पुरस्कार प्राप्त झाला आहे.


लोकमंगल फाऊंडेशन
स्वागत कक्ष


साहित्य वाटप


लोकमंगल फाऊंडेशन
वर साहित्य वाटप







# अन्नपूर्णा योजनेसाठी आपण असे योगदान देऊ शकता...

लोकमंगल फाऊंडेशन एक सामाजिक चळवळ



₹१८,२५०/-
१ लाभार्थ्यांचा
एक वर्षाचा खर्च

₹२७,५००/-
५५० लाभार्थ्यांचा
एक दिवसाचा खर्च

₹७६,५००/-
५१ लाभार्थ्यांचा
एक महिन्याचा खर्च

₹८,२५,०००/-
५५० लाभार्थ्यांचा
एक महिन्याचा खर्च

धान्यरूपी देणगी स्वीकारली जाईल.

| प्रति महिना | |
|---|---|
| गहू | २४०० किलो |
| तांदूळ | १०२० किलो |
| तेल | ३४५ किलो |
| डाळ | ४५० किलो |

## लोकमंगल फाऊंडेशन

१३-अ, 'अन्नपूर्णा', सह्याद्री कॉलनी, विकास नगर, जुना होटगी नाका, सोलापूर - ४१३ ००३.

### ऑनलाईन देणगी करीता

www.lokmangalfoundation.com

DONATE NOW

साईटवर येथे क्लिक करा.

### बँक द्वारे

लोकमंगल फाऊंडेशन

लोकमंगल को.-ऑप. बँक लि., सोलापूर

**A/c No. 0020 0111 2000 1713**

Branch IFCS Code : IBKL0478LOK, Branch: Gold-Finch Peth, Solapur.

AXIS BANK

**A/c No. 2660 1010 0040 017**

Branch IFCS Code : 0000266 Branch: Dafrine Chowk, Solapur.

Lokmangal Foundation

All in One QR

UPI & Wallet G Pay Paytm

BHIM UPI

*८० जी अंतर्गत देणगीदारास आयकरामध्ये सूट मिळेल. | आजच व्हिजिट करा 0217 / 2606070 YouTube @lokmangalfoundation 7774070302 | www.lokmangalfoundation.com / lokmangalgroups@gmail.com

अखंड गतीतून सार्थकता

सन २०२४